**कृपया प्रसिद्धीसाठी** **3 जून 2014**

**भर दुपारी सूर्यास्त : राम नाईक**

**मुंबई, मंगळवार :** ''सूर्य उदयाला येत असतानाच अचानक अस्तंगत झाला आहे. श्री. गोपीनाथ मुंडे म्हणजे महाराष्ट्राचा झंझावात! ग्रामपंचायत ते विधानसभा ते लोकसभा अशी त्यांच्या यशाची चढती कमान होती. मोदींच्या नेतृत्वाखाली ग्राम विकास मंत्री या नात्याने देशाच्या विकासात गोपीनाथजी मोलाची कामगिरी बजावतील असा विश्वास होता. परंतु नियतीनेच विश्वासघात केला. महाराष्ट्रात पुन्हा एकदा भगवा फडकवायची जिद्द कै. मुंडे यांनी बाळगली होती. आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीचे राज्य आणणे हीच गोपीनाथजींना खरी श्रद्धांजली असेल.'' अशा शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी शोक व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**